# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

**२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**

मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८

**फोन २२७०४४००,२२७०३०८६** **फॅक्स (०२२) २२७०३०८६**

**E-mail - mail@mchmumbai.org** **Web site:www.mchmumbai.org**

## जाहिर आवाहन

होमिओपॅथी सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन अध्यक्षा, डॉ. सौ. रजनी इंदूलकर यांनी महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेस सूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांच्या अडचणी, शासन यंत्रणेकडून त्यांना होणारा त्रास, पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या अडचणी, CCMP उत्तीर्ण व्यावसायिकांच्या येणाऱ्या अडचणी, महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रश्न, महाविद्यालयांच्या दैनंदिन व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणी, केंद्रिय होमिओपॅथी आयोगातर्फे पंजीकरण संबंधात नव्याने केलेले रेग्युलेशन, होमिओपॅथीसाठी स्वतंत्र संचालनालय व बजेट तरतूद, राज्यात शासकीय होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढविणे, होमिओपॅथी पदवीधारकांना शासकीय सेवेत थेट प्रवेश मिळणेकरिता सूचना, सावरीकर समितीने आयुष सेवे संबंधी तयार केलेल्या आकृती बंधावरील आपले मत या व इतर संबंधीत समस्या/मागण्या यासंबंधीची सविस्तर टिपणी राज्यातील होमिओपॅथिक व्यावसायिकांच्या नोंदणीकृत संघटना, विद्यार्थी संघटना(नोंदणीकृत) नोंदणीकृत प्राचार्य व अध्यापक संघटना यांनी परिषदेचा अधिकृत ई-मेल आयडी mail@mchmumbai.org या ई-मेल वर दि. ५ फेब्रुवारी २०२४ किंवा त्या पूर्वी पाठवाव्यात. त्यानंतर परिषदेतर्फे या विषयावर एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले जाईल. त्या चर्चासत्रास सल्लागार समितीच्या मा. अध्यक्षा, मा. सदस्य, परिषदेचे मा. प्रशासक, समिती सदस्य मा. उपसंचालक होमिओपॅथी हे पूर्णवेळ उपस्थित राहून आढावा घेतील व सर्वकष अहवाल तयार करुन शासनास सादर केल्यानंतर मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री (गृह), मा. उपमुख्यमंत्री (वित्त), मा. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्री, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा. अन्न व औषध विभाग मंत्री, विधी व न्यायमंत्री, संबंधीत सर्व खात्यांचे सर्व उच्चाधिकारी, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद व होमिओपॅथी सल्लागार समिती यांची बैठक लावून सर्व विषय मार्गी लावण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल.

चर्चासत्राकरिता, सर्व संघटना व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, प्राचार्य, आध्यापक, अध्यापक, विद्यार्थी यांना उपस्थित राहण्याची परवानगी असेल. तसचे ज्यांनी सूचना सादर केल्या आहेत अशा नोंदणीकृत संघटनांच्या निवडक प्रतिनिधींना त्यांच्या मतांचे मंचावरुन विवेचन करण्यास संधी दिली जाईल.

ठिकाण - मुंबई

दि.- १७ जानेवारी २०२४

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

**२३५ पेनिनसुला हाऊस, तिसरा मजला, डॉ.दादाभाई नौराजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**

मोबाईल ८४२२०६८६५८/९८९२४८३१७८

**फोन २२७०४४००,२२७०३०८६** **फॅक्स (०२२) २२७०३०८६**

**E-mail - mail@mchmumbai.org** **Web site:www.mchmumbai.org**


## जाहिर निविदा

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद मुंबई या विधीमंडळ अधिनियमाप्रमाणे स्थापित स्वायत्त संस्थेला आपल्या मुंबईस्थित कार्यालयाकरिता बांधून वापरण्याकरिता तयार असलेली अंदाजे २,५०० ते ६,००० स्वे. फूट जागा मालकी हक्काने खरेदी करावयाची आहे. तरी इच्छूक जागा मालकांनी कार्यालयात रोख रक्कम रु. ५०००/- भरुन निविदा प्राप्त करुन योग्य रित्या भरलेली निविदा आवश्यक ती सर्व कागदपत्रे किंवा कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह परिषदेच्या कार्यालयात दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सीलबंद लखोटयात सादर कराव्यात. सदर निविदांबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार परिषद राखून ठेवत आहे.

परिषदेच्या अटी -

१) निविदा सादरकर्ता हा जागेचा अधिकृत मालक किंवा विक्री व्यवहाराचे कायदेशीर हक्क प्राप्त असलेला मुखत्यारपत्रधारक असावा.

२) जागा स्वमालकीची/विकसक म्हणून मुखत्यारपत्रक असल्याबाबत/विक्रीचे कायदेशीर मुख्यत्यारपत्र असल्याचे व संपूर्ण जागा बोजाविरहीत व निर्वेध असल्या संबंधीचे रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र निवीदेसोबत जोडलेले असावे.

३) इमारतीचा मंजूर ले आऊट तसेच महागनर पालिकेने मंजूर केलेला बांधकाम आराखडा व जागा असलेला व बांधकाम पूर्तता दाखला, भोगवटा प्रमाणपत्र, अग्नीसुरक्षा प्रमाणपत्र, प्रॉपर्टी कार्ड, चालू महिन्यातील विद्यामान तारखेपर्यंत कायद्याने देय असलेले सर्व सरकारी व महापालिकेला कर भरले असल्या संबंधीच्या पावत्या, इमारतीमध्ये केलेल्या विद्युतीकरणाचा आराखडा व सुरक्षा प्रमाणपत्र, इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडीटची प्रत, लिफ्ट पाणी, जीना व इतर सामायिक सुविधा वापरणे बाबत तसेच सामायिक मेंटेनन्स बाबतचे सोसायटीचे करारपत्राची प्रत सादर करावी.

४) निविदेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यालयीन जागेचा व पार्किंग स्पेसच्या दराबाबतचा दर वेगवेगळा नमूद करावा.

ठिकाण - मुंबई
दि.- १७ जानेवारी २०२४

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

डॉ. विलास हरपाळे
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी
मुंबई -१